आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

**Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages**

June 2021, Issue-77, Vol-01

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

14) IMPACT OF COVID-19 ON THE ENVIRONMENT
Dr. Dinesh Kumar Patidar, Jhabua (MP) ||60

15) DETERMINATION OF AGE UNDER POCSO, 2012VIZ A VIZ JUVENILE JUSTICE ...
V. Saratha Devi ||63

16) To study stress level of women suffering from polycystic ovary ...
Deepmala Sudhare (Kshirsagar) ||68

17) महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समिती : एक अभ्यास
प्रा. डॉ. ए. टी. तवार & प्रा. बेलुरे विशाल चंद्रशेखर, जि. नांदेड ||72

18) बेरोजगारीची समस्या व वाढती गुन्हेगारी
डॉ.दांडगे एल.जी., ता.जि.औरंगाबाद ||73

19) भारतीय औद्योगिक क्षेत्रातील कलहाची समस्या
प्रा.डॉ. गव्हाळे बी.व्ही., जि.पुणे ||76

20) नरहर कुरुंदकरांची दलित साहित्यविषयक भूमिका
प्रा.डॉ. दादाराव गुंडरे, जि. उस्मानाबाद ||83

21) दुर्गाबाई भागवतांच्या 'भावमुद्रा' या ललितनिबंध संग्रहातील मुक्तचिंतन
प्रा.शैला जगदबे, नांदेड ||86

22) अच्युताश्रमांचे वाङ्मय - विविध संप्रदायांचा समन्वय
प्रा. डॉ.मेधा गोसावी, बीड ||91

23) भारतातील दहशतवाद – एक आढावा
प्रा.डॉ.कुंभारकर के.जी., जि.लातूर ||94

24) रामासामी पेरियार सामाजिक व राजकीय कार्य
प्रा.डॉ. अर्जुन ढवाळे, जिल्हा औरंगाबाद ||97

25) कोविड –१९ चा भारतातील आदिवासीवर पडलेला प्रभाव
डॉ.कुसुम विजयकुमार चौधरी, मुंबई ||101

26) कवी सुमंत यांच्या 'नारायण पासष्टी'चे वेगळेपण
प्रा.डॉ. गजानन जाधव, जि. जालना ||107

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned by CamScanner

३) प्रा.डॉ.खेडकर,गिते,शिंदे आणि शेख, ''औद्योगिक अर्थशास्त्रीय पर्यावरण,''सक्सेस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती जून २०१४,पृष्ठ क्र. ६,७.

४) प्रा.डॉ.खेडकर,गिते,शिंदे आणि शेख, ''औद्योगिक अर्थशास्त्रीय पर्यावरण,'' सक्सेस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती जून २०१४,पृष्ठ क्र. ६,७.

५) प्रा.के.एच.ठक्कर,''भारतीय अर्थव्यवस्था, '' फडके प्रकाशन,कोल्हापूर, तिसरी आवृत्ती १९७६. पृष्ठ क्र. ३७९.

६) प्रा.के.एच.ठक्कर,''भारतीय अर्थव्यवस्था, '' फडके प्रकाशन,कोल्हापूर, तिसरी आवृत्ती १९७६. पृष्ठ क्र. ३७९.

७) प्रा. देव आणि झामरे,'' भारतीय अर्थव्यवस्था, '' पिंपळापूरे प्रकाशन,नागपूर,चौथी आवृत्ती सप्टेंबर १९९८.

८) प्रा. डॉ. भालेराव आणि देसाई,''भारतीय अर्थव्यवस्था,'' निराली प्रकाशन,पुणे, प्रथम आवृत्ती जून १९९८.

□□□

20

# नरहर कुरुंदकरांची दलित साहित्यविषयक भूमिका

**प्रा.डॉ. दादाराव गुंडरे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब,
ता. कळंब, जि. उस्मानाबाद

************

आचार्य नरहर कुरुंदकर हे एक समाजवादी विचारवंत, साहित्यिक, समीक्षक, वक्ते, शिक्षक म्हणून सुप्रसिद्ध. बदलत्या सामाजिक परिस्थितीचे आकलन करून त्यास शब्दरूप देणाऱ्या विचारवंतात नरहर कुरुंदकर यांचा समावेश होतो. यांनी मराठी वैचारिक साहित्यात लोकशाही, विचारस्वातंत्र्य, समानता आणि सामाजिक बांधीलकी या मूल्यांचा प्रभावी पुरस्कार केला. नवा सामाजिक आकृतीबंध डोळ्यांसमोर ठेवून लेखनास प्रारंभ केला. मानवी जीवनाच्या विविध अंगांशी चिंतनात्मक स्वरूपाची मांडणी करणाऱ्या विचारवंतांच्या लेखणीतून वैचारिक साहित्याची निर्मिती आजपर्यंत होत आलेली आहे. यामध्ये मराठवाड्यातील सुप्रसिद्ध समीक्षक, विचारवंत, साहित्यिक, व्याख्याते म्हणून सुप्रसिद्ध असणाऱ्या नरहर कुरुंदकरांचा समावेश होतो. नरहर कुरुंदकरांनी सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, वाङ्मयीन व शैक्षणिक अशा विविध विषयावर विपूल लेखन केले आहे. नानाविध विचारांना चालना देणारे त्यांचे हे चौफेर लेखन प्रभावशाली बनले. जे लेखन स्वातंत्र्योत्तर कालखंडात निदर्शनास येते.

दलित प्रश्न, वर्ण-वर्ग संघर्षासाठी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सयाजीराव गायकवाड या सुधारकांचा वारसा जपणारे, दलिताबद्दल आत्मीयता असणारे पुरोगामी विचारवंत म्हणून नरहर कुरुंदकर यांच्याकडे पाहिले जाते. दलित साहित्य हा नरहर कुरुंदकरांच्या चिंतनाचा विषय राहिला आहे. दलित साहित्यावर त्यांनी जवळपास पंचवीस ते तीस लेख लिहिले आहेत. त्यांनी दलित साहित्याचा शोध घेताना, दलित साहित्याचा आधार एखाद्या जातीत जन्माला येणे हा नसतो तर तो आधार सामाजिक जाणीवेत शोधला पाहिजे असे म्हटलेले दिसून येते. यामधून दलित साहित्य नेमके कशाला म्हणावे हे जरी स्पष्टपणे

Scanned by CamScanner

निर्देशित होत नसले तरी त्यांचे निकष तरी हाती येतात. दलित साहित्य या संकल्पनेचा परिचय होण्याचा ते विचार देतात. यापुढे जाऊन ते विद्रोहात्मक सामाजिक जाणीवेतून दलित जीवनाचे चित्रण करणाऱ्या साहित्यास दलित साहित्य म्हणावे असे मत नोंदवतात.

दलित साहित्यासंबंधी त्यांच्या भजन या ग्रंथात सात लेख आहेत. या ग्रंथातील वर्ण-वर्ग समन्वय व माझी भूमिका या लेखातील विचार दलित चळवळ साहित्याची दिशा दाखवून देतात. तसेच दलितांनी कोषातून बाहेर पडावे हा लेख दलितांना दिव्य दृष्टी प्राप्त करण्यासाठी मार्गदर्शक ठरतो. इ.स. १९६९ ते १९८० या काळात कुरुंदकर दलित जीवन व दलित साहित्य यासंबंधी जे बोलले ते सर्व साररूपाने भजन या ग्रंथातून आलेले आहे. हे त्यांनी या ग्रंथाच्या प्रस्तावनेत स्वत: नमुद केले आहे. दलित साहित्यासंबंधी घेतलेल्या भूमिकेचा आढावा घेताना प्रा. बाळकृष्ण कवठेकर लिहितात, कुरुंदकरांचा दलित साहित्यविचार हा त्यांच्या दलित जीवन विचाराचा भाग असून तो साहित्यविचार हा जीवनाचाच एक भाग असतो. या त्यांच्या भूमिकेशी सुसंगत आहे. दुसरे असे की कुरुंदकरांचा दलित साहित्यविचार हा त्यांच्या एकूण साहित्य विचाराशी अत्यंत सुसंगत असा आहे. म्हणजेच असे की, ज्या जीवनवादी भूमिकेतून कुरुंदकर एकूण साहित्याचा विचार करतात ती जीवनवादी भूमिका त्यांच्या साहित्यविषयक लेखनातून प्रकट होते. तिसरे असे की, दलित साहित्याच्या प्रारंभापासूनच कुरुंदकर हे त्या साहित्याच्या पुरस्कर्त्यांपैकी एक प्रमुख समीक्षक असून त्यांचे लेखन सहानुभूतीच्या ओलाव्याने निसरडे झाले नाही. वाङ्मयीन सृजनशीलतेच्या पोषणासाठी सहानुभूतीची कड आणि आवेशाच्या गर्जना या दोन्ही बाबी सारख्याच निरुपयोगी असतात. हे कुरुंदकरांनी लक्षात घेतले आहे. म्हणून दलित साहित्याची स्वागतार्हता मान्य करूनही कुरुंदकर पुरेशा वस्तुनिष्ठपणे दलित साहित्याची समीक्षा करताना दिसतात. यावरून असे ध्यानात येते की, नरहर कुरुंदकर हे दलित साहित्याच्या समीक्षेसाठी स्वतंत्र मूल्ये असावीत हे मानायला तयार होत नाहीत. ज्या मूल्यांच्या आधारे दलितेत्तर साहित्याची समीक्षा केली जाते त्याच मूल्यांच्या आधारे दलित साहित्याची ते समीक्षा करतात. म्हणून त्यांना दलित साहित्यासंबंधी समकालीन वास्तवाच्या चित्रणापेक्षा जाणीवांची मुलभूत आणि सार्वत्रिकता अधिक महत्त्वपूर्ण वाटते. अनुभवाच्या एकपदरीपणापेक्षा त्यांची गुंतागुंत, अनेकपदरीपणास अधिक महत्व देतात.

दलित प्रश्नासंबंधी नरहर कुरुंदकर म्हणतात, कोणे एके काळी वर्णव्यवस्था अस्तित्वात होती. या वर्णव्यवस्थेतून जातीव्यवस्था निर्माण झाली हे पटत नाही. सामाजिक रचना म्हणून वर्णव्यवस्था अस्तित्वात नव्हती. तसेच जुन्या काळात वर्ण गुणधर्मावरून ठरत असे ही समजुत चुकीची आहे. इतर क्षेत्राप्रमाणे याही क्षेत्रात आपल्या शक्तीशाली विचाराने निकराचे भांडण सुरू ठेवले आहे. जातीची रचना ही उतरंडीसारखी होती. यानुसार प्रत्येक जात आपले श्रेष्ठत्व टिकवण्याचा प्रयत्न करीत होती. याशिवाय त्यांचा दलित समस्येचा विचार लक्षात घेतला असता भारतीय समाजसुधारकांनी भांडवलशाहीचा विचार केल्याचे दिसत नसल्याचेही नमूद केलेले दिसून येते.

दलित साहित्याच्या संदर्भात नरहर कुरुंदकर म्हणतात, मला स्वतःला दलित साहित्याचा विचार करताना विद्रोहाची जाणीव जास्त महत्त्वाची वाटते. या जाणीवेचा नेमका धागा आपण घेतला पाहिजे. नाहीतर-नानाविध घोटाळा होण्याचा संभ्रम असतो. केवळ दलित समाजात जन्माला आले म्हणून त्यांचे साहित्य हे दलित साहित्य मानणे चुकीचे आहे असा विचार केल्यास अनेक अडचणी येतात. जे साहित्य व्यक्तींची सुखदुःखे रंगविण्यात गुंतलेले असते ते दलित साहित्य समजण्यास काही हरकत नाही. प्रामुख्याने दलित साहित्याचा आधार हा सामाजिक जाणीवेत शोधला पाहिजे यावर त्यांनी अधिक भर दिला. यापुढे जाऊन लेखकाची जन्मकुंडली न पाहता लेखक ज्या जीवनाचे चित्रण करतो त्यावरून देखील दलित साहित्याची कल्पना स्पष्ट होते असेही नमुद केले. तसेच ज्या साहित्यात दलितांचे चित्रण ते दलित साहित्य म्हणून स्वीकारावे अशीही त्यांची भूमिका नव्हती. या भूमिकेमूळेच त्यांनी श्री. म. माटे यांना आद्य दलित साहित्यिक संबोधले आहे. अत्यंत व्यापक स्वरूपात ही भूमिका मांडतात. कोणत्या जीवनजाणीवेतून लेखन होते हा मुद्दा खुप महत्त्वाचा मानला आहे. ती जाणीव म्हणजे विद्रोहात्मक जाणीव होय. त्यामूळेच विद्रोहात्मक सामाजिक जाणीवेतून दलित जीवनाचे चित्रण करणाऱ्या साहित्याला नरहर कुरुंदकर दलित साहित्य असे म्हणतात.

वैचारिक भूमिका मांडताना दलित साहित्य व नवसाहित्य यामधील परस्पर संबंधाचाही स्वतंत्रपणे विचार केला आहे. मूल्यात्मक निराळेपण जाणवले ते प्रकट केले. दलित साहित्याची समीक्षा अत्यंत परखडपणे केली. जीवनासाठी कला या विचारसरणीचा पुरस्कार करताना केवळ दलित म्हणून जन्मास येणे ही बाब त्या लेखन दलित आहे असे शिक्कामोर्तब करण्यास पुरेशी नसल्याचे म्हटले आहे.

दलित साहित्यविषयक भूमिका विशद करताना त्यांनी केवळ आत्मभाव व्यक्त केला आहे असे नाही तर व्यापक स्वरूपात टीका टिप्पणीही केली आहे. दलित साहित्य हे अंधश्रद्धा, परंपरा व



Scanned by CamScanner

धार्मिक विधींच्या तीव्र विरोधात आहे हा विरोध मानवतेसाठी आहे. दलितांना मानवतेपासून दूर ठेवणाऱ्या अस्पृश्यतेविरुद्ध आवाज उठवतात. यासाठी अन्यायाला विरोध करणारी, निषेध करणारी व नकाराची जाणीव ते अभिव्यक्त करतात. तसेच दलित साहित्यात क्रोध, भूक व दारिद्र्य यांची देखील वास्तवपूर्ण अभिव्यक्ती मिळाली आहे. केवळ क्रोधच नाही तर स्वप्नांना देखील वाट मोकळी करून देतात. यातून ते आशावादी तसेच उज्ज्वल भविष्याची नांदी सूचित करताना दिसतात.

विद्रोह हा दलित साहित्याचा महत्त्वाचा निकष मानला. त्यामुळेच दलित साहित्याला व त्यातील चित्रणाला वेगळेपणा, मूल्यात्मकता लाभते. तसेच सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीनेही ते महत्त्वाचे ठरते. नरहर कुरुंदकर दलित साहित्यांच्या विद्रोहातील सामाजिक जाणीवेला अधिक महत्व देतात. या विद्रोहात्मक सामाजिक जाणीवेमुळेच दलित साहित्य हे सामाजिक जाणीवेमुळेच दलित साहित्य हे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक गुलामगिरी विरुद्ध बंड करून उठते. या निकषावर दलित साहित्य हे नवसाहित्यापेक्षा निराळे ठरते हे दाखवून देतात. दलित साहित्यातून प्रकट होणाऱ्या जाणिवेस अनेकपदरी अस्तित्व आहे. त्यामध्ये आर्थिक व सामाजिक पदर अधिक महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद करतात.

दलित साहित्याच्या वैशिष्ट्याविषयी मत नोंदवताना त्यांनी नकार यासही महत्त्व दिले. विद्रोहाच्या अनुषंगाने नकाराविषयी देखील लेखन केले. ते म्हणतात, विद्रोहाचे जे सामर्थ्य आहे ते परंपरागत अन्याय समाजरचनेला ठाम नकार देण्यात आणि कोणतेतरी एक भव्य स्वप्न उराशी बाळगून त्या स्वप्नांचा पाठलाग करताना बेभानपणे बाळवंट तुडवण्यात असते. अशा शब्दातून नकाराचा योग्यपणा हा दलित साहित्यास सामर्थ्य प्राप्त करून देतो हे निर्देशित करतात.

**निष्कर्ष :**

नरहर कुरुंदकरांचे लेखन, संशोधन बहुआयामी व मौलिक स्वरूपाचे आहे. वैचारिक क्षेत्रातील योगदानही महत्त्वाचे ठरते. चतुरस्त्र व्यक्तीमत्त्व, चिकित्सक विचार करायला लावणाऱ्या व्यक्तींमध्ये त्यांचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागतो. एखाद्या घटनेविषयी सर्वांगीण विचार प्रकट करण्यासाठी निबंध हा सर्व सोयींनी युक्त असा प्रकार वाटला. यांचीच निवड दलित साहित्य विषयक भूमिका मांडण्यासाठी केली. १९६० नंतर निर्माण झालेल्या दलित साहित्य चळवळीची त्यांनी खंबीरपणे पाठराखण केली. एवढेच नाही तर साहित्यातील नवनव्या प्रवाहाची स्वागतशील दृष्टीकोनातून दखल घेतली. त्यांचा दलित साहित्यविचार हा जीवनाचाच एक भाग असतो. लेखनातून प्रकट होतो. दलितेतर साहित्याप्रमाणे दलित साहित्याच्या समीक्षेसाठी वेगळी मूल्य नसावीत असे मत नोंदवतात. अत्यंत वस्तुनिष्ठपणे दलित साहित्याची समीक्षा करतात. दलित समाजात जन्माला आलेल्या व्यक्तीच्या हातून झालेली निर्मिती म्हणजे दलित साहित्य नसून त्याचा आधार सामाजिक जाणीवेत शोधला पाहिजे. चित्रणापेक्षा जाणीवेस महत्व देतात. याशिवाय दलित साहित्याचे विद्रोहात्मक जाणीव व नकार हे निकष मानतात. जरी त्यांचे लेखन दलित साहित्याचा सांगोपांग विचार करणारे नसले तरी त्यांनी मांडलेली दलित साहित्यविषयक भूमिका दलित साहित्य नेमके कशाला म्हणावे याचे काही निकष हाती देते. दलित साहित्य हे माणूस म्हणून जगण्याचा हक्क मागते. अन्यायाविरुद्ध आवाज उठवते. दलित साहित्यिकांना जीवनात व जीवन जगण्यात अर्थ वाटतो फक्त ते जीवन बदलण्याच्या मार्गास लागलेले आहेत. व्यक्तीचे श्रेष्ठत्व जन्म, जात यानुसार न ठरता कर्मानुसार ठरते असे मानणाऱ्या विचारशैलीचे ते विचारवंत आहेत. हे त्यांच्या दलित साहित्यविषयक भूमिका मांडणाऱ्या निबंधातून स्पष्ट होते.

**संदर्भग्रंथ :**


१. कवठेकर बाळकृष्ण, प्रतिसाद, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९९५.

२. कुरुंदकर नरहर, भजन, इंद्रायणी साहित्य, पुणे, प्रथमावृत्ती २०००.

३. वाडिकर भु. द., शब्दार्थी-नरहर कुरुंदकर, निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती १ जानेवारी १९९९.

४. देशपांडे एल. एम., वाडीकर शैलजा, आचार्य नरहर कुरुंदकर यांचे विचारंधन, क्रिएटिव्ह पब्लिकेशन्स, नांदेड, प्रथमावृत्ती २००८.


□□□

Scanned by CamScanner